


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २९१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०२ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# विषारी दारुकांड प्रकरण; अनेकांच्या संसाराची राखरांगोळी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, पुणे :** गावठी दारूमुळे बळी गेल्यानंतर उत्पादन शुल्क विभाग ॲक्शन मोडवर आला आहे. दोन दिवसांमध्ये दहा ठिकाणचे दारूअड्डे नष्ट करण्याची कामगिरी करण्यात आली आहे. शनिवारी अड्डे नष्ट करण्याबरोबर संबंधितांविरोधात ३३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यातील २५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक हजार ७२७ लिटर गावठी दारूसह १७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**शुल्क विभागावर टीकेची झोड**

विषारी दारूमुळे १९ जणांचा बळी गेल्यानंतर पोलिसांपाठोपाठ उत्पादन शुल्क विभागावर टीकेची झोड उठली आहे. या कारणास्तव उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात २१ पथकांची नियुक्ती करून छापेमारी करण्यास सुरुवात केली आहे. अवैधरीत्या गावठी दारू तयार करणारी ठिकाणे नष्ट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. पुणे शहरासह जिल्ह्यातील दहा ठिकाणी शनिवारी छापे टाकून उत्पादन शुल्क विभागाने गावठी दारूचे अड्डे नेस्तनाबूत केले.

पुणे शहरातील कोथरूड, आंबेगाव पठार, काळेपडळ, भूगाव, आळंदी, शिंदवणे, ससेवाडी, तळेगाव, नगरगाव (शिरूर) या ठिकाणचे अड्डे नष्ट केले आहेत. या कारवायांमध्ये एक हजार ७२७ लिटर गावठी तयार दारू, १६ हजार ३०० लिटर रसायने जप्त करून १७ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. संबंधितांवर ३३ गुन्हे दाखल करून २५ जणांना अटक केल्याचे उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. पुणे शहराजवळील लोणी काळभोर, सोरतापवाडी, शिंदवणे, तळेगावजवळ आंबी, शिरगाव; तसेच शिरूर तालुक्यातील आपटी, लोणावळ्याजवळील वाड्यावस्त्या; तसेच आळंदीजवळील खेड येथील अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले.

**'मिथेनॉल'वापर प्रथमच**

गावठी हातभट्टी दारूनिर्मितीसाठी रसायने वापरतात. ही दारू म्हणजे इथेनॉलचाच एक प्रकार मानला जातो. मात्र, हडपसर, पिंपरीत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींनी प्यायलेल्या दारूत मिथेनॉलचा वापर केल्याचे प्रथमच उघडकीस आले आहे, याकडे उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष वेधले.



**पिंपरीत ११ कारवाया**

अवैध दारूविक्री आणि निर्मिती प्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात ११ कारवाया करून सुमारे दोन लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवायांमध्ये एका अल्पवयीन मुलासह १३ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हे शाखा युनिट-चारच्या पथकाने एमबी कॅम्प देहूरोड येथे कारवाई करून राजेश श्रीरंग कदम (वय ५३, देहूरोड) याच्यावर गुन्हा दाखल केला.

मावळ तालुक्यातील पुसणे येथे ओढ्याकाठी कारवाई करून महिलेवर गुन्हा दाखल केला. मालमत्ता गुन्हेविरोधी पथकाने हिंजवडी येथे कारवाई करून धनराज सोमाजी नट (रा. हिंजवडी) याच्यावर गुन्हा दाखल केला. खंडणी विरोधी पथकाने दारूची वाहतूक करणारी एक रिक्षा पकडून गामरबहादूर ढकळ (वय ४६) आणि संतोष रनवरे (वय ३०) यांच्यावर गुन्हा दाखल केला. बावधन पोलिसांनी ३६ वर्षीय महिलेकडून १७ हजार ८०० रुपयांचा दारूसाठा जप्त केला.

**दोन वेगवेगळ्या खोल्यांवर छापे**

चिंचवड पोलिसांनी नंद डेअरीच्या पाठीमागे कारवाई करून महिलेला ताब्यात घेतले. दक्षिण म्हाळुंगे पोलिसांनी निघोजे येथील एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले. सिग्मा चौकातील कारवाईदरम्यान आरोपी दुरेश रमेश राठोड (वय ३३) पळून गेला. पिंपरीतील भाटनगर येथे पोलिसांनी दोन वेगवेगळ्या खोल्यांवर छापे टाकून दोन महिलांच्या घरांतून दारूसाठीचे साहित्य जप्त केले. चऱ्होली खुर्द येथे कारवाई करून एका महिलेवर आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. दक्षिण महाळुंगे पोलिसांनी दारूविक्री करणाऱ्या सुरेश रमेश राठोड (वय ३३) याच्यावर गुन्हा दाखल केला.

# अखेर सईद खान यांनाच उमेदवारी! 'अक्षराज' च्या वृत्तावर शिक्कामोर्तब

## परभणी-हिंगोली विधान परिषदेत महायुतीचा नवा चेहरा

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०१, परभणी :** हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी शिवसेना (शिंदे गट) आणि महायुतीकडून अखेर अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सईद खान यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**● विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच दैनिक अक्षराज ने परभणी-हिंगोली विधान परिषदेत शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी सईद खान यांना संधी देण्याची मागणी या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते.**

आता प्रत्यक्ष उमेदवारी जाहीर झाल्याने त्या चर्चांवर शिक्कामोर्तब झाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व राजकीय अंदाजांना छेद देत अल्पसंख्याक समाजातील युवा आणि सक्रिय नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. त्यामुळे परभणी आणि हिंगोली जिल्ह्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. सईद खान हे गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेत सक्रिय असून अल्पसंख्याक समाजात मजबूत जनसंपर्क, संघटन कौशल्य आणि पक्षनिष्ठा यामुळे त्यांची



वेगळी ओळख निर्माण झाली आहे. राज्यभरात शिवसेना अल्पसंख्याक आघाडी मजबूत करण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शेकडो लोकप्रतिनिधींनी शिवसेनेत प्रवेश केला असून पक्षाचा विस्तार करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा मानला जातो. पाथरी विधानसभा मतदारसंघात त्यांनी विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका आणि संघटनात्मक बांधणीमध्ये प्रभावी कामगिरी केली आहे.

नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकांमध्ये त्यांनी



दैनिक **अक्षराज** संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

अचूक वेध, अचूक बातमी

मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

**परभणी-हिंगोली विधान परिषदेत शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी सईद खान यांना संधी देण्याची मागणी**

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२०, परभणी :** महाराष्ट्रात विधान परिषद निवडणुकीची राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून महायुती आणि महाविकास आघाडीने जोरदार रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. परभणी-हिंगोली विधान परिषद मतदार संघात सध्या राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत असून विविध पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची चाचपणी सुरू आहे.

समोर आलेल्या पक्षीय बलाबलाच्या आकडेवारीनुसार परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे १३१ सदस्य, भाजपचे ९९, काँग्रेसचे ५९, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ४३ तर शिवसेना शिंदे गटाचे ७७ सदस्य असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या मतदारसंघात महायुतीसाठी योग्य उमेदवार निवडणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. राजकीय वर्तुळात शिवसेना शिंदे गटाकडून आनंद भरोसे, विप्लव बजोरिया आणि सईद खान यांच्या नावांची चर्चा सुरू असून त्यामध्ये सईद खान यांचे नाव विशेष चर्चेत आले आहे. अल्पसंख्याक समाजामध्ये मजबूत जनसंपर्क, संघटन कौशल्य आणि पक्षासाठी सातत्याने केलेले काम यामुळे त्यांना एक प्रभावी चेहरा म्हणून पाहिले जात आहे. राजकीय जाणकारांच्या मते, जर उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी सईद खान यांना विधान परिषदेसाठी उमेदवारी दिली तर त्याचा मोठा राजकीय संदेश संपूर्ण महाराष्ट्रात जाऊ शकतो. मुस्लिम समाजामध्ये शिवसेनेबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण होऊन भविष्यात पक्षाला मोठा राजकीय फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सईद खान हे अल्पसंख्याक समाजातील एक अभ्यासू आणि सक्रिय नेतृत्व म्हणून ओळखले जातात. गेल्या काही वर्षांत त्यांनी शिवसेना पक्ष वाढविण्यासाठी मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात जनसंपर्क मोहीम, सामाजिक कार्यक्रम आणि संघटनात्मक काम केले आहे. त्यामुळे ते एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या विश्वासू कार्यकर्त्यांपैकी एक मानले जातात. परभणी आणि हिंगोली या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे मोठे मतदान लक्षात घेता सईद खान यांची उमेदवारी ही केवळ एका व्यक्तीची निवड न राहता भविष्यातील मोठ्या राजकीय समीकरणांची सुरुवात ठरू शकते, अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे.

शिवसेनेला ग्रामीण भागासह अल्पसंख्याक समाजात अधिक मजबूत करण्यासाठी नवीन आणि समाजात काम करणाऱ्या चेहऱ्यांना संधी देणे गरजेचे असल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे परभणी आणि हिंगोली विधान परिषद मतदार संघासाठी सईद खान यांना उमेदवारी मिळावी, अशी मागणी आता वेगाने पुढे येत आहे.

Main Edition - 21 May 2026 - Page 4
Powered By Aksharaj Media

पक्षाला यश मिळवून दिल्याने त्यांचे राजकीय वजन वाढले आहे.

परभणी-हिंगोली मतदारसंघात महायुतीची ताकद वाढवण्यासाठी तसेच अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सईद खान यांची निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून अनेक पदाधिकारी, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य आणि स्थानिक नेत्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

दरम्यान, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सईद खान यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुतीचे अनेक वरिष्ठ नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुकीत महायुतीने विजयासाठी जोरदार तयारी सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, सईद खान यांच्या उमेदवारीमुळे परभणी-हिंगोलीच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता असून आगामी काळात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील लढत अधिक रंगतदार होणार आहे.

# परभणीत पत्नीकडून पतीचा काटा;

## धारदार शस्त्राने वार करून घरातच संपवले!




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, परभणी :** शहरातील खंडोबा बाजार (खंडोबा कॉर्नर) भागात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. एका ३० वर्षीय व्यक्तीचा त्याच्याच पत्नीने कट रचून, आपल्या साथीदारांच्या मदतीने धारदार शस्त्राने वार करून निर्घृण खून केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणाने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव फेरोज खान अब्दुला खान (वय ३० वर्ष) असे आहे. शनिवार, ३० मे च्या मध्यरात्री ते रविवारच्या पहाटे १.२० ते १.४० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मराठवाडा शाळेजवळील एका घरात फेरोज खान यांच्यावर धारदार शस्त्राने गळ्यावर, पोटावर आणि हातावर सपासप वार करण्यात आले. गंभीर जखमी झाल्यामुळे आणि अति रक्तस्रावामुळे फेरोज खान यांचा जागीच मृत्यू झाला.

**खुनाचे कारण आणि संशय :** पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृत फेरोज खान आणि त्यांची पत्नी झिनत फेरोज खान (वय २८ वर्ष) यांच्यात गेल्या काही दिवसांपासून चारित्र्याच्या संशयावरून सतत वाद होत होते. याच वादातून आणि संशयातून पत्नी झिनत हिने आपल्या साथीदारांसह मिळून पतीचा काटा काढण्याचा कट रचल्याचे तपासात समोर आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील आणि नानलपेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह भेट देऊन पाहणी केली. फिंगरप्रिंट आणि श्वानपथकाच्या मदतीने घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा करण्यात आले आहेत. मृताचा भाऊ सरफराज खान अब्दुला खान (रा. उस्मानिया कॉलनी, परभणी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नानलपेठ पोलीस ठाण्यात आरोपी पत्नी झिनत खान आणि तिच्या साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व ३(५) अन्वये खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# जिल्ह्यात अमली पदार्थ प्रतिबंधासाठी प्रभावी उपाययोजना करा : जिल्हाधिकारी वसुमना पंत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक, साठवणूक आणि वापराला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नार्को-कोऑर्डिनेशन समिती गठित करण्यात आली आहे. अमली पदार्थाच्या प्रतिबंधासाठी विविध विभागाला नेमून दिलेली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी तसेच प्रभावी उपाययोजनेच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्हा नशामुक्त करण्याच्या दृष्टीने सर्वांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या.

पोलिस विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या माहिती देत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, तहसीलदार विजय पवार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक, पोलिस निरीक्षक अमोल बारापात्रे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, जिल्ह्यामध्ये अमली पदार्थाची विक्री, वाहतुक व साठवणूक होणार नाही, याची दक्षता घ्या. शाळा, महाविद्यालय आणि खाजगी शिकवणी वर्गाच्या परिसरात विशेष गस्त ठेवा. तसेच विद्यार्थ्यांचे वसतिगृह परिसरात सुध्दा निगरानी ठेवावी. मेडिकल दुकानातून नशा करणारे ड्रग्ज अवैधरित्या विकले जात असेल, तर त्यावर त्वरित कारवाई करा. अचानकपणे मेडिकल दुकानांवा भेट देऊन तपासणी करावी. शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात प्रतिबंधात्मक




पदार्थाची विक्री होणार नाही, याची खात्री करावी. तसेच अमली पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी.

टपालाद्वारे येणाऱ्या पार्सलमध्ये काही अमली पदार्थाबाबत संशय आल्यास टपाल विभाग व प्रादेशिक परिवहन विभागाने त्याची सूचना पेलिसांना द्यावी. सर्व पोलिस विभागाने अमली पदार्थ बाळगणाऱ्यांवर वेळोवेळी धाडी टाकाव्यात. तसेच अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करावी, अशाही सूचना जिल्हाधिकारी पंत यांनी दिल्या.

# सापळा रचून 'पाहिजे' आरोपी अटकेत !




**दि.०१, येरवडा (पुणे) :** लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने राबविलेल्या विशेष मोहिमेत गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपीला शिताफीने अटक करून त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल व एक जिवंत काडतूस जप्त केले आहे. या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा धक्का बसला आहे. कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान पोलीस शिपाई अक्षय शिंदे, कादीर शेख, अमोल गायकवाड, राहुल परदेशी यांना गोपनीय माहिती मिळाली की, येरवडा पोलीस ठाण्यातील गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी साजिद ऊर्फ डीजे मोहम्मद शेख (वय २०, रा. कामराजनगर, येरवडा) हा त्याच्या राहत्या घरी येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र कदम आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने आरोपीच्या घराजवळ सापळा रचला. पोलीस पथक घरात दाखल होताच आरोपीने पहिल्या मजल्यावरील खिडकीतून उडी मारून शेजारच्या घरांच्या पत्र्यांवरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून साजिद ऊर्फ डीजे मोहम्मद शेख आणि त्याचा साथीदार शुभम राजेंद्र बोत (वय २६) यांना शिताफीने ताब्यात घेतले.

पंचांसमक्ष घेण्यात आलेल्या अंगझडतीदरम्यान साजिद याच्याकडून एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल व एक जिवंत राऊंड हस्तगत करण्यात आला. त्यानंतर दोघांनाही पुढील कायदेशीर कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. सदर कारवाई अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आली. आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असतानाही पोलिसांनी धाडस आणि प्रसंगावधान दाखवत त्याला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून लक्ष्मीनगर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.




## मदतवाटपात एकसूत्रीपणा कधी?

राज्यातील शेतीला निसर्गाच्या लहरीपणाचा गेल्या काही वर्षांपासून सातत्याने फटका बसत आहे. त्यात राज्याच्या सर्वच भागांतील शेतकरी भरडला जातो. अतिवृष्टी, गारपीट झाल्याने बाधित झालेल्या शेतीची पाहणी सरकारी यंत्रणेकडून करून पंचनामे होतात. मग मदतीचे निकष ठरतात. बाधित क्षेत्राचा टक्का नेमका किती टक्क्यांपेक्षा जास्त झाला तर नुकसानभरपाई द्यावी, याचे परिमाणही ठरलेले आहेत. पंचनाम्यांनंतर अहवाल संकलित होणे, जिल्हास्तरावरून विभागस्तरावर कागदी नोंदींचे एकत्रीकरण करून त्याचा अहवाल राज्य सरकारकडे पाठवणे आणि त्यानंतर नुकसानभरपाईच्या निधीचे वितरण अशी ही कार्यवाही सर्वसाधारणपणे होते. अनुदान वाटप प्रक्रियेतील त्रुटींबाबत वारंवार चर्चा होते; पण त्यातून काही बदल अद्याप झालेले नाहीत.

अलीकडच्या काळातील उदाहरणांतून हे अधिक ठळकपणे अधोरेखित होईल. मार्च २०२६मध्ये राज्यातील २२ जिल्ह्यांत अवकाळी पाऊस, गारपीट झाली. पंचनामा प्रक्रियेनंतर नुकसानभरपाईसाठी प्रस्ताव सादर केले. महसूल विभागाने १८ मे रोजी काढलेल्या अध्यादेशात सांगली, पुणे, नागपूर, चंद्रपूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नांदेड, धाराशिव, जालना, लातूर, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, वाशिम, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहिल्यानगर या जिल्ह्यांत मार्च महिन्यातील अवकाळी पाऊस, गारपिटीने एक लाख ६७ हजार ५९५ शेतकऱ्यांचे ९३ हजार ८४७ हेक्टर शेती क्षेत्र बाधित झाले. त्यासाठी १६४ कोटी ८३ लाख ४४ हजार रुपये अनुदान मंजूर केल्याचे म्हटले आहे. खरे तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अवकाळी पाऊस, गारपिटीने शेतीचे नुकसान झाले होते. मात्र, मंजुरीच्या या यादीत त्याचे नाव नाही. पुढे मराठवाड्यातील उर्वरित तीन जिल्ह्यांनाही लाभ होईल की नाही, ते सांगता येत नाही. पण ही तफावत का केली जाते याकडे कोण लक्ष देणार?

सन २०२५मध्ये अतिवृष्टीने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांची पाठ नैसर्गिक आपत्तीने २०२६ मध्येही सोडली नाही. शेतीचे नुकसान तपासून महसूल व कृषी विभागाने पंचनामे करून राज्य सरकारकडे अहवाल पाठवला. काही दिवसांपूर्वी नुकसानीची मदत सरकारने जाहीर केली. त्यात जिल्हानिहाय अनुदान मंजुरी केल्याचे समोर आले. २०२५चा खरीप हंगाम अंतिम टप्प्यात असताना अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले. शेती अक्षरश: खरडून गेली. त्यात रब्बी हंगामात गारपिटीने नुकसानीत भर पडली.

शेतीचे आर्थिक गणित एक वर्ष कोलमडले तर शेतकऱ्याना ते तीन वर्षे मागे घेऊन जाते. राज्यभरात झालेल्या अवकाळी पावसानंतर नुकसान पाहणी करून जिल्ह्यांमधून आलेले अहवाल विभागस्तरावर एकत्रित करून राज्य सरकारकडे पाठविले गेले. हे पाठविण्यासाठी कुठलीही मुदत दिली जात नसते. कारण अवकाळी पाऊस काही एकाच वेळी संपूर्ण राज्यभर पडलेला नसतो. त्यामुळे सरकारदरबारी गेलेल्या अहवालांचे एकत्रीकरण करून राज्यातील जिल्ह्यांत किती नुकसान झाले आहे, त्यासाठी किती अनुदान मंजूर केले आहे हे पाहून एकाच टप्प्यात सर्व जिल्ह्यांना अनुदान वाटप करणे सयुक्तिक असते. कारण, नुकसानीमुळे शेतकरी आधीच आर्थिक विवंचनेत असतो. त्यात पुढच्या हंगामाची तयारी करताना काही पैसे हातात असले तर नियोजन करणे सोपे जाते. जिल्हानिहाय नुकसानीचा टक्का कमी–अधिक असला तरी मदतीचे वितरण एकाच वेळी झाल्यास सर्वच विभागांतील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होईल, हे धोरणकर्त्यांना कसे लक्षात येत नाही?

मागील वर्षी खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगाम शेतकऱ्यांसाठी नुकसानदायी ठरले. अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी पावसाने पिके मातीमोल झाली. शेतीला अशा अरिष्टातून बाहेर काढण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहेच; पण शेतकऱ्यांना भरीव अशी तातडीची मदत करण्याची जबाबदारीही सरकारने पार पाडावी. तरच त्याचा उपयोग होईल.

**– मकरंद कुलकर्णी**

# विषारी दारूचे बळी!

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्याने गेल्या तीन दिवसात २३ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने राज्यभर खळबळ माजली आहे. विषारी दारूच्या या मृत्यकांडाने सर्वसामान्य नागरिकांनाच नाही तर सरकारलाही धक्का बसला आहे म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून या दारूकांडला जबाबदार असणाऱ्या काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई देखील केली आहे. अर्थात सरकारने केलेली ही कारवाई योग्यच आहे असे म्हणावे लागेल कारण संबंधित अधिकाऱ्यांनी जर आपले कर्तव्य चोख बजावले असते तर हे २३ जीव वाचले असते. आता या दारुकांडाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई होईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. या विषारी दारूकांडाने सपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली असली तरी विषारी दारू पिऊन मृत्यूकांड घडल्याची ही देशातील पहिली घटना नाही याआधी अशा अनेक घटना घडल्या असून त्यात अनेकांचा जीव गेला आहे. दरवर्षी देशात कोठेना कोठे अशा घटना घडतच असतात. मागील वर्षी बिहारमध्ये अशी घटना घडली होती आणि त्यात ७ जणांचा मृत्यू झाला होता. त्याआधी ऑक्टोबर २०२४ मध्ये बिहारमध्येच ४० जणांचा विषारी दारूने बळी घेतला होता. २०२२ साली तर बिहारमधील छपरा जिल्ह्यात ७३ जणांना विषारी दारूने जीव गमवावा लागला होता. बिहारमधीलच गोपालगंज येथे २०१६ साली १६ लोक विषारी दारूचे बळी ठरले होते.




विशेष म्हणजे बिहारमध्ये संपूर्ण दारू बंदी आहे असे असतानाही तिथे खुलेआम दारूविक्री होते. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पंजाबमध्येही अशा घटना घडल्या आहेत. पंजाबमध्ये तर विषारी दारूने एकाच वेळी ९० जणांचा बळी घेतला होता. काही वर्षापूर्वी मुंबईतही अशी दुर्दैवी घटना घडली होती. विषारी दारूने आजवर देशात शेकडो लोकांचा बळी गेला आहे तरीही त्यातून काही धडा घेतला जात नाही. आताही मुख्यमंत्र्यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत ही स्वागतार्ह बाब असली तरी त्यातून काही सध्या होईल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की, त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला जातो पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते ? त्यातून दोषींना शिक्षा होते का ? शिक्षा होते तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तीर्णच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादन करून ती विकली जात असताना पोलिस आणि प्रशासन काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारूमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकतात. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथेनॉल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहे हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो. ही दुदैवी घटनाही मिथेनॉलमुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज न्यायवैद्यक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. आपल्या देशात विनापरवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला माहीत देखील असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचेही हात आधीच ओले केले असल्याने ते याकडे कानाडोळा करतात. त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी मोठी दुर्दैवी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरीओम होतो. दारू माफिया व पोलिस आणि प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही तोवर अशा घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने पुणे पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली. मात्र ही कारवाई एवढ्यावरच न थांबवता पोलिसांनी यामागील पाळेमुळे शोधून काढली पाहिजे. दारू माफिया कितीही मोठा असला तरी त्याच्यावर कारवाई करण्याची धमक पोलिसांनी दाखवायला हवी. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही भान त्यांना नसते दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासनस्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ‘एसटी’चा प्रवास अधिक सुखकर व्हावा !

एसटी अर्थात समस्त राज्याची लाडकी ’लालपरी’चा वाढदिवस नुकताच संपन्न झाला. ३६ गाड्यांसह सुरु झालेल्या एसटीचा प्रवास आज राज्यभरात अविरतपणे सुरु आहे. आजमितीला १८ हजाराहून अधिक गाड्या महामंडळात सेवा देत आहेत. शहरी भाग सोडला तर एसटी हा ग्रामीण भागातील नागरिकांचा नेहमीच जिवाभावाचा विषय ठरला आहे.

तालुक्यात शिक्षणासाठी प्रतिदिन जाणारी शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळी असो वा आठवडी बाजारात खरेदीसाठी जाणारी ग्रामस्थ मंडळी असो, माहेरी पाहुणचार घेण्यासाठी आलेली नवविवाहिता असो वा नोकरी व्यवसायानिमित्त दैनंदिन प्रवास करणारी मंडळी असो सर्वांनाच इच्छित स्थळी नेण्याचे आणि आणण्याचे काम आजवर राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीने केले आहे. एसटीचे चालक–वाहक आणि एसटीने नियमित प्रवास करणारी मंडळी यांच्यामध्ये एक अतूट नाते निर्माण झाले आहे. नेहमीची व्यक्ती स्थानकावर दिसली नाही कि एसटीच्या वाहकालाही चुकल्याचुकल्या सारखे वाटते. एसटीच्या चालकांनाही नेहमीच्या रस्त्यातील खड्डे, गतिरोधक, वळणे अगदी तोंडपाठ झालेली असतात त्यामुळे एखाद्या ठिकाणी अधिक प्रवासी चढले उतरले तरी नेहमीच्या थांब्यांवर एसटीची यायची वेळ सहसा चुकत नाही. आज जी कोकण रेल्वे भरभरून वाहते आहे हा सारा भार पूर्वी एसटी आपल्या अंगा खांद्यावर वाहत होती. आजमितीला ज्या गावात अन्य वाहने पोहोचली नाहीत अशा गावांतही एसटीचे जाळे पसरले आहे. आजही सुट्टीत शहरातून गावाला जायचे म्हटले तर रेल्वे स्थानकावर उतरल्यावर पुढचा प्रवास अनेकांना एसटीनेच करावा लागतो.

### लोक बोले

तोंडावरी गोड गोड
बहुतांश लोक बोले
मान्यकरे सारेकाही
मान जोरजोरा डोले

फिरता पाठआपली
दुर्गंधीचे मुख खोले
बदलले रे लाळघोटे
शिवराळ शब्दओले

हळू हळू मुक्त होती
शिवीशाप साठलेले
वाहू लागे अखंडीत
भाव बर्फ गोठलेले

बोलाकधी समोरुन
हिंमतीस कायझाले
हेलकावले इथेतिथे
मागे पुढे झुले झुले

ओठावर बंदिशाळा
मन मात्र किती सले
चावी नाही बनवली
कुलूप लावी कसले

खरी शिक्षा आपणा
त्यांचेझाले चांगभले
कैक आले कैकगेले
टोचतराहतात भाले

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक दृष्टी, अचूक बातमी

वाढत्या महागाईसोबत लोकांची मिळकतही वाढली, मिळकत वाढल्याने राहणीमानही बदलत गेले, त्या अनुषंगाने परिवहन महामंडळातही अधिक सोयी आणि सुविधा पुरवणारे बदल झाले. शहर वाहतुकीत वातानुकूलित गाड्या आल्या तशा राज्य परिवहन महामंडळातही गारेगार प्रवासाचा अनुभव देणाऱ्या वातानुकूलित गाड्यांचा प्रवेश झाला. या गाड्यांना राज्यातील नागरिकांनीही भरभरून प्रतिसाद दिला आणि आजही देत आहेत. आता तर इलेक्टिक बसेसही महामंडळात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणातही एसटी हातभार लावत आहे. राज्य सरकारने महिला प्रवाशांसाठी तिकीट दरात ५० टक्के सूट दिल्यामुळे महिला प्रवाशांची संख्या कमालीची वाढली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आता महिला वाहकही एसटी गाड्यांतून जागोजागी दिसू लागल्या आहेत. रस्त्यांचे जाळे गावागावांत पसरले असले तरी सर्वच रस्ते गुळगुळीत आहेत असे नाही. अनेक ठिकाणी मातीच्या कच्च्या रस्त्यांतून एसटीला प्रवास करावा लागतो. आजमितीला राज्यातील अनेक भागांत रस्ता रुंदीकरणाची आणि दुरुस्तीची कामे सुरु आहेत अशा वेळी खडकाळ रस्त्यातून मार्ग काढत लालपरी नागरिकांना इच्छित स्थळी पोहोचवण्याचे कार्य अविरतपणे करत आहे.




आजमितीला अनेक भागांत मोठ्या प्रमाणात प्रवासी उपलब्ध असताना त्या भागांत एसटीच्या दिवसातून केवळ २ ते ३ फेऱ्या होतात. मधल्या काळात स्थानिक वडापवाले कोंबून प्रवाशी भरून बक्कळ पैसे कमावत असतात. राज्यातील जवळपास सर्वच एसटी डेपोच्या बाहेर वेगवेगळ्या मार्गाने प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या काळी पिवळी गाड्यांचा समूह प्रवाशांना हातवारे करत बोलावताना दिसून येतो. या ठिकाणी एसटी बसेस जाऊ शकत नाहीत का ? दरवर्षी एसटी महामंडळ तोट्यात असल्याचे दाखवण्यात येत असले, तरी एसटीला नफ्यात आणण्याचे उपायसुद्धा एसटीकडेच आहेत. आजमितीला एसटी महामंडळाकडे असलेला बसगाड्यांचा ताफा राज्याच्या वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या तुलनेत खूपच अल्प आहे.

काही मार्गांवर धावणाऱ्या एसटी बसेसची संख्या कमी असल्याने जेव्हा केव्हा या गाड्या थांब्यावर येतात तेव्हा प्रवासी त्यावर तुटून पडतात. एकमेकांना मागे टाकत बसमध्ये बसण्यासाठी जागा मिळवण्याच्या संघर्षात महिला, लहान मुले, वयोवृद्ध यांचे अतोनात हाल होतात. सणासुदीच्या काळात महामंडळाकडून जादा गाड्या सोडूनही त्यासुद्धा कमी पडतात, ज्याचा लाभ खासगी ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट कंपन्या घेतात, इच्छित स्थळी जाण्यासाठी प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडी आकारतात. एसटी उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना नाईलाजाने या लुटीचा सामना करावा लागतो. कालानुरूप अद्यावत होत असणारे एसटी महामंडळ वाढत्या लोकसंख्येनुरुप गाड्यांची संख्या का वाढवत नाही ? गाड्या वाढल्या कि प्रवाशांची सोय तर होणारच आहे शिवाय अनेकांना रोजगारही उपलब्ध होणार आहेत. आजही अनेक एसटी बसेसमध्ये आसने मोडलेली दिसून येतात, खिडकीच्या काचा पुढे मागे सरकत नाहीत, पावसाळ्यात छत गळत असते, बाहेरील बाजूने पत्रे वाकलेले अथवा बाहेर आलेले असतात. गाड्यांचे सस्पेन्शन ढिले झालेले असते. एसटी बस थांब्यावर येते तेव्हा ती कुठे जाणार आहे याबाबतचा फलक बऱ्याचदा लावलेला नसतो, काही वेळा वाहकांचे प्रवाशांशी बोलणे उर्मटपणाचे असते. एसटी आगाराच्या स्थितीबाबत तर बोलायलाच नको.

एसटी आगाराच्या भिंती, प्रसाधनगृह गुटखा–पान खाऊन प्रवाशांनी रंगवलेल्या दिसून येतात, अनेकदा प्रसाधनगृहात पाणी नसते, आगारांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था दिसून येत नाही, असलीच तर त्या ठिकाणची अस्वच्छता पाहिल्यावर बाहेर विकत घेऊन पाणी पिणे सोयीचे वाटते, एसटी आगारात असलेल्या उपहारगृहात नेहमीच पदार्थांची वानवा असते. प्रवाशांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या चौकशी कक्षातील कर्मचारी प्रवाशांशी उद्धटपणे बोलत असतात. एखाद्या आगाराचे दुरुस्तीचे काम काढले तर ते पुढे वर्षोनुवर्षे चालूच असते. एसटी महामंडळ हा एक सेवाभावी उपक्रम आहे. या उपक्रमातील त्रुटी दूर करून ग्राहकांचा प्रवास सुलभ आणि सुखकर व्हावा यासाठी राज्य सरकार काही प्रयत्न करणार आहे का ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी दामोदर कोलते मंगल कार्यालय गोधणी रोड नागपूर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिलकुमार ढोले (प्रदेश अध्यक्ष धनगर अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य), उदघाटक संदीप जाधव (माजी उपमहापौर मनपा नागपूर), प्रमुख व्याख्याते पवन कृष्णाजी बोदरे, स्वागताध्यक्षा संगीता दिपक गिऱ्हे माजी नगरसेवक, मुख्य पाहुणे रोषणा सिद्धूकोलते, नगराध्यक्ष नगरपंचायत गोधणी प्रमुख पाहुणे राहुल मनोहर सभापती नगरपंचायत गोधणी, स्नेहल बंडूजी ठाकरे नगरसेविका, शैलेश पांडे नगरसेवक मनपा नागपूर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन व प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे मुख्य व्याख्याते पवन कृष्णा बोदरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास लोकांपर्यंत पोहचवा. कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिलकुमार ढोले यांनी अहिल्यादेवी होळकर यांनी सत्कर्म केले त्याप्रमाणे मानवांनी सुद्धा करावे असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन सुवर्णा बोबडे यांनी केले, प्रास्ताविक ज्ञानेश्वर बांबल यांनी केले तर आभार प्रदर्शन रामचंद्र चुकांबे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी गोविंदराव टेकाडे, यादवराव घायवट, यशवंत कातरे, ज्ञानेश्वर बांबल, जगदीश शेकार, रामचंद्र चुकांबे, विलास डाखोळे, चिंतामण डाखोळे, हरीचंद्र तवले, लिलाधर वैद्य, निलेश बोबडे, लुकेश तवले, हुणेश टेकाडे आदींनी प्रयत्न केले.

## आचारीच्या मुलीची मुंबई पोलीस दलात निवड



**अक्षराज : अर्जुन कवडे**

**दि.०१, येरमाळा (धाराशिव) :** कष्ट, जिद्द, मेहनत आणि आई-वडिलांच्या पाठबळाच्या जोरावर प्रियंका श्याम भांडे हिने मुंबई पोलीस दलात निवड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे परिसरात तसेच कुटुंबात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे.

प्रियंका हिने गेल्या ३ वर्षांपासून पोलीस भरतीचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून सातत्याने मेहनत घेतली. सकाळी लवकर उठून मैदानी सराव, दिवसभर लेखी परीक्षेचा अभ्यास आणि संध्याकाळी पुन्हा शारीरिक तयारी असा तिचा दिनक्रम होता. प्रतिकूल परिस्थिती, उन्हाळा, पाऊस किंवा थंडी यांची पर्वा न करता तिने आपल्या ध्येयासाठी अविरत प्रयत्न सुरू ठेवले. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून प्रियंकाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले आणि अखेर मुंबई पोलीस दलात निवड होण्याचा मान मिळवला. तिच्या या यशामुळे कुटुंबाचा गौरव वाढला असून परिसरातील युवक-युवतींसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## जनगणना करणाऱ्या प्रगणकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिक्षक भारतीचे निवेदन




**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०१, चिमूर (चंद्रपूर) :** बहुप्रतीक्षित भारताच्या जनगणनेचा पहिला टप्पा सध्या सुरु आहे. जनगणनेच्या या पहिल्या टप्प्यात घर गणना केली जात आहे. जनगणनेच्या या राष्ट्रीय कार्यात शिक्षकांचा मोठा सहभाग आहे. जनगणनेच्या या कार्यात प्रगणकाचे काम करताना शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनगणनासंबंधी प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या विविध मागण्यांचे निवेदन जनगणना कार्यालय संचालक, मुंबई यांना चिमूरचे तहसिलदार श्रीधर राजमाने यांचेमार्फत देण्यात आले.

निवेदनात पुढील मागण्यांचा समावेश आहे. जणगणनेचा पहिला टप्पा प्रचंड उन्हाळ्यात असल्याने उष्माघाताच्या घटनांमुळे प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना विमा संरक्षण देण्यात यावे, जणगणनेच्या कार्यासाठी दिलेल्या कालावधीच्या बदल्यात भरपाई रजा मंजूर करण्यात यावी, सदर रजा अर्जित रजा खात्यात जमा करण्यात यावी, जणगणना केल्याच्या कार्याचे अधिकृत प्रमाणपत्र देण्यात यावे, जनगणनेच्या पहिल्या टप्प्याचे ९ हजार रुपये संबंधितांच्या खात्यावर जमा करण्यात यावे. तहसीलदार यांनी या मागण्या वरिष्ठ स्तरावर पाठविणार असल्याचे याप्रसंगी शिष्टमंडळाला आश्वासित केले. निवेदन देताना शिक्षक भारती नागपूर विभाग अध्यक्ष सुरेश डांगे, चिमूर तालुका अध्यक्ष कैलाश बोरकर, बंडू नन्नावरे, रावन शेरकुरे, संजय बरडे उपस्थित होते.

## तुंगत ग्रामपंचायत येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३१, पंढरपूर :** ज्यांनी आपल्या न्यायप्रियतेने, लोककल्याणकारी कार्याने आणि अद्वितीय नेतृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळवले. त्या राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती तुंगत ग्रामपंचायत येथे मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरी करण्यात आली. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याचा, त्यागाचा, दूरदृष्टीचा आणि समाजहितासाठी केलेल्या असंख्य पराक्रमांचा गौरवपूर्ण आढावा घेण्यात आला.

स्त्रीशक्ती, न्याय, सेवा आणि राष्ट्रभक्ती यांचे जिवंत प्रतीक असलेल्या अहिल्यादेवींचा आदर्श आजही प्रत्येक पिढीला प्रेरणा देणारा आहे. गावच्या सरपंच, सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा जपत समाजहित, शिक्षण, एकता आणि विकासाचा मार्ग अधिक बळकट करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# चंद्रपुर जिल्ह्यात एका दिवसात २ वाघांचा मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात वन्यजीवांच्या मृत्यूच्या अत्यंत दुर्दैवी घटना समोर आल्या असून यामध्ये दोन वाघांना आपला जीव गमवावा लागला आहे. पहिली घटना ब्रम्हपुरी वनविभागात घडली असून येथे एका विहिरीत पडल्याने प्रौढ वाघाचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या घटनेत ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या (टीएटीआर) बफर झोनमध्ये मृत्यू झाला.

ब्रम्हपुरी वन विभाग अंतर्गत येणाऱ्या सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील डोंगरगाव बीटमध्ये चारगाव बगडे, हजारीचक रिट येथे शेतकरी पांडूरंग गोविंदा गजभीये यांच्या शेतशिवार सर्व्हे क्रमांक ५१ मधील शेतामध्ये एका वाघाचा मृत्यू झाल्याची घटना ३१ मे रोजीसकाळी उघडकीस आली. शेतकरी ३१ मे रोजी सकाळी आपल्या शेतावर गेला असता, दुर्गंधी आल्यामुळे त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले, तेव्हा त्यांना एक वाघ मृत अवस्थेत आढळून आला. सदर विहिर २५ ते ३० फुट खोल असून तिला संरक्षक कठडे नव्हते.

विहिरीत पडलेला मृत वाघ हा नर जातीचा असून साधारणपणे ९ ते १० दिवसापूर्वी विहिरीत पडला असावा, असा अंदाज यावेळी व्यक्त करण्यात आला आहे. शेतकऱ्यानो या घटनेची माहिती तातडीने सिंदेवाही वनविभागाला दिली. वनरक्षक सचिन चौधरी यांनी तत्परतेने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या घटनेची कल्पना दिली. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी अंजली सायंकार, क्षेत्र सहाय्यक नितीन गडपायले, क्षेत्र सहाय्यक फुलझाले, क्षेत्र सहाय्यक ममता गायकवाड, तसेच वनरक्षक ऋषी जावडे आणि राहुल धनविजय यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. उपवनसंरक्षक कुमार स्वामी, सहाय्यक वनसंरक्षक महेश गायकवाड, सहाय्यक वनसंरक्षक अरविंद जे. एन. टी. सी. ए. प्रतिनिधी बंडू धोतरे, आणि एन. जी. ओ. प्रतिनिधी 'स्वाब' संस्थेचे अध्यक्ष यश कायरकर यांच्या उपस्थितीत पंचनामा (मोक्का पंचनामा) करण्यात आला.

दुसऱ्या घटनेत. वन अधिकाऱ्यांनी सांगितले की, शनिवार संध्याकाळी ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील पलासगाव रेंजमध्ये चार महिन्याचा एक नर वाघ शावक मृत अवस्थेत आढळून आला. हा शावक त्या वाघिणीच्या तीन पिल्लांपैकी एक होता, ज्यांची या भागात नियमितपणे देखरेख केली जाते. शालकाच्या मृदेहाबाबत माहिती मिळताच वन कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आवश्यक ती कारवाई पुर्ण केली.

वन्यजीव पशुवैद्यक डॉ. रविकांत खोब्रागडे आणि डॉ.पोडचलवार यांनी शावकाचे शवविच्छेदन केले. सुरुवातीच्या तपासणीत असे समोर आले आहे कि, शावकाचा मृत्यू तीव्र उष्णतेमुळे (लु लागल्याने) झालेल्या गंभीर न्यूरोलॉजिकल शॉकमुळे (तांत्रिक तंत्रावर पडलेला मोठा आघात) झाला आहे. बफर चे उपसंचालक कुशाग्र पाठक यांनी या निष्कर्षांना दुजोरा दिला असून त्यांनी सांगितले कि, शावकाच्या शरीरावर कोणत्याही जखमा किंवा कोणत्याही प्रकारच्या घातपाताचे निशाण आढळले नाहीत. त्यांनी पुढे माहिती दिली कि, वाघिणीची उर्वरित दोन्ही पिल्ले पूर्णपणे निरोगी असून ती सध्या आपल्या आईसोबत जंगलात सुरक्षितपणे फिरत आहेत.

व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये वन्यजीवांच्या नियमित देखरेखी अंतर्गत वन अधिकारी त्या वाघिणीवर आणि तिच्या उर्वरित पिल्लांवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत.

# खारपाडा टोलनाका आंदोलनाची पुढील दिशा संयुक्त पाहणी व बैठकीनंतर ठरणार




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०१, खारपाडा (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील खारपाडा टोलनाका येथे जन आक्रोश समितीचे मागील सात दिवसांपासून सुरू असलेले ठिय्या आंदोलन आणि आमरण उपोषण रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी संपन्न झाले. अपूर्ण मुंबई-गोवा महामार्गावर सुरू करण्यात आलेला टोल तात्काळ बंद करावा, ही

या आंदोलनाची प्रमुख मागणी होती. बहुसंख्य कोकणकर आंदोलनस्थळी उपस्थित राहिले होते.

गेल्या ७ दिवसांपासून आंदोलनस्थळी ठामपणे बसलेल्या तीन उपोषणकर्त्यांनी तसेच उपस्थित कोकणकरांनी अत्यंत संयमाने आणि जिद्दीने हा लढा दिल्याने प्रशासनाला महामार्गावरील अपूर्ण कामे व त्रुटींची गंभीर दखल घ्यावी लागली.

आंदोलना दरम्यान सादर करण्यात आलेल्या कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे प्रशासनाने टोलनाका काही काळासाठी बंद ठेवला. दुपारी १२ वाजता बंद झालेला टोल सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आला. सुरू झालेला टोलनाका तात्काळ बंद करणे ही अत्यंत कठीण प्रक्रिया असतानाही आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर प्रभावीपणे बाजू मांडल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

संबंधित आरओ. (RO) अधिकारी यांच्यासोबत टोलनाक्याबाबत ०१ जून रोजी महत्त्वपूर्ण बैठक होणार असून त्यानंतर पोलीस प्रशासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि आंदोलनकर्ते यांच्या उपस्थितीत महामार्गाची संयुक्त पाहणी (Joint Survey) करण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर जन आक्रोश समिती पुढील ठोस भूमिका निश्चित करणार आहे.

**जनतेचा आक्रोश; नजीकच्या काळात आंदोलन अधिक तीव्र होणार**

- सरकारच्या अनास्थेमुळे या महामार्गांवर निष्पाप कोकण करांचे अपघाती मृत्यू होऊन अनेक कुटुंब उध्वस्त झाली असताना, मुंबई - गोवा महामार्ग पूर्ण होण्याआधीच सरकारने टोल वसुली करुन कोकणकरांच्या जखमेवर मीट चोळल्याच्या संतप्त प्रतिक्रिया कोकण प्रांतातून उमटत आहेत.
- सरकारने योग्य निर्णय नाही घेतल्यास आंदोलन तीव्र करुन कोकणातील सत्ताधारी आमदार, खासदार, मंत्री यांच्या नावाने आणि विरोधात भीक मागो आंदोलन सुरु होणार.
- मुंबई - गोवा महामार्गाचे काम पूर्ण होण्याआधीच टोल वसुली सुरु राहिल्यास कोकणातील लोकप्रतिनिधिंच्या नावाने व त्यांच्या प्रयत्नाने /सौजन्याने टोल वसुली सुरु असल्याचे ठळक बोर्ड लावण्याची चळवळ सुरु होणार.

# ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक




## आकाश पाटील यांचा ठाणे तालुक्यातून नामांकन अर्ज दाखल

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, ठाणे :** ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणूक २०२६-२०३१ साठी शिवसेनेचे मुख्यनेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली ठाणे तालुका मतदारसंघातून युवा नेतृत्व आकाश बाबाजी पाटील यांनी नुकताच आपला नामांकन अर्ज दाखल केला.

कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नामांकन प्रक्रियेतील सर्व औपचारिकता पूर्ण करण्यात आल्या. यावेळी कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील, विभागप्रमुख निलेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. नामांकनानंतर आकाश पाटील यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस उपस्थित मान्यवरांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनामुळे सहकार क्षेत्रात आकाश पाटील यांच्या निवडीमुळे जिल्ह्याचा विकास अधिक गतीने होईल, असा विश्वास आमदार राजेश मोरे यांनी व्यक्त केला.

# वडनेरभैरव अत्याचार प्रकरण: संशयित नराधम शिक्षकाच्या पोलीस कोठडीत ३ जूनपर्यंत वाढ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, चांदवड (नाशिक) :** चांदवड तालुक्यातील वडनेरभैरव येथील एका नामांकित शाळेत अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचार प्रकरणातील संशयित आरोपी शिक्षक मन्सूर सादिक मणियार याच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. निफाड येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**नेमके प्रकरण काय?**

वडनेरभैरव येथील शाळेतील एका १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ काढून, त्याआधारे तिला ब्लॅकमेल केल्याचा खळबळजनक आरोप शिक्षक मन्सूर मणियार याच्यावर आहे. याप्रकरणी वडनेरभैरव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला २८ मे रोजी अटक करण्यात आली होती.

**या कलमांखाली गुन्हा दाखल :**

आरोपी शिक्षकावर कायद्याचा कठोर बडगा उगारण्यात आला असून, खालील कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे:

भारतीय न्याय संहिता : कलम ७४, ६४(२)(एफ), ६५(१)

पॉक्सो कायदा : कलम ४, ६, ८, १२ (बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण)

माहिती तंत्रज्ञान कायदा (IT Act): कलम ६६(क)

**न्यायालयात काय घडले?**

आरोपीची पहिली पोलीस कोठडी १ जून रोजी संपत असल्याने, तपास अधिकारी पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांनी सोमवारी (दि.०१) त्याला निफाडच्या विशेष जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले.

सरकारी पक्षातर्फे सहाय्यक जिल्हा सरकारी वकील ॲड. रामनाथ शिंदे यांनी न्यायालयासमोर जोरदार युक्तिवाद केला. गुन्ह्याचे गांभीर्य अत्यंत मोठे आहे. आरोपीकडून अधिक सखोल चौकशी करणे, महत्त्वाचे इलेक्ट्रॉनिक पुरावे, फोटो आणि व्हिडिओ फुटेज हस्तगत करणे अद्याप बाकी आहे, असे सांगत त्यांनी वाढीव कोठडीची मागणी केली.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपी मन्सूर सादिक मणियार याला ३ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# सुप्रसिद्ध ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे वाकरूळ येथे जाहीर कीर्तन संपन्न

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०१, पेण (रायगड) :** मावळा प्रतिष्ठान व प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मंगेश दळवी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गजर कीर्तनाचा... सोहळा आनंदाचा या धार्मिक व आध्यात्मिक उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे भव्य जाहीर कीर्तन पेण पूर्व विभागातील वाकरूळ येथील वाकेश्वर मंदिर परिसरातील विस्तीर्ण मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या कीर्तन सोहळ्यास रायगड जिल्ह्यासह परिसरातील विविध भागांतून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली. मैदान भाविकांनी फुलून गेले होते. हरिनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. कीर्तनादरम्यान उपस्थित भाविकांनी नामस्मरणात सहभागी होत अध्यात्मिक आनंदाची अनुभूती घेतली.

ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आपल्या ओघवत्या, विनोदी आणि प्रबोधनात्मक शैलीतून अध्यात्म, संस्कार, व्यसनमुक्ती, सामाजिक बांधिलकी, कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व तसेच समाजातील विविध विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांना उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, पेण व रायगड परिसरातील सुमारे ८० टक्के जनता वारकरी संप्रदायाशी जोडलेली आहे. या भागातून मोठ्या प्रमाणात दिंड्या निघतात. मुलांना केवळ पैसा कमविण्यासाठी नव्हे, तर चांगले संस्कार मिळावेत यासाठी शिक्षण द्यावे, असा संदेश त्यांनी दिला. जगातील सर्वात मोठी संपत्ती म्हणजे संस्कार असल्याचे नमूद करत समाजात सुसंस्कारित पिढी घडविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

तसेच सध्या अनेक राज्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याबद्दल चिंता व्यक्त करत या शाळा टिकवण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले. जनसेवा हीच ईश्वरसेवा या विचारातून मावळा प्रतिष्ठान सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात कार्य करत असून, त्यांच्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.



या कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील, पेण नगराध्यक्ष प्रितम पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव मानकर, पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मावळा प्रतिष्ठानच्या सामाजिक, धार्मिक आणि संस्कारक्षम उपक्रमांचे कौतुक करत आयोजकांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मावळा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच वाकरूळ ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्था आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा कीर्तन सोहळा यशस्वी ठरला. वाकरूळ येथे पार पडलेल्या या भव्य कीर्तन सोहळ्यामुळे परिसरात भक्ती, अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश पोहोचला असून हा कार्यक्रम उपस्थित भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.

# दिवा गरीब विद्यार्थ्यांसाठी देवदूत ठरले नगरसेवक शैलेश पाटील

## गरजूंसाठी २४ तास खुले कार्यालय



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, दिवा (ठाणे) :** आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, या उद्देशाने दिवा शहरातील कार्यसम्राट नगरसेवक शैलेश पाटील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी देवदूत ठरत आहेत.

गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, शाळा-कॉलेज प्रवेश आणि फी भरण्यासाठी ते थेट सहकार्य करत आहेत. त्यांच्या या कार्याची नागरिकांकडून सर्वत्र प्रशंसा होत आहे.

केवळ शिक्षणच नाही, तर सामाजिक कार्यातही शैलेश पाटील आघाडीवर आहेत. गरजू रुग्णांना वेळोवेळी आर्थिक मदत आणि इतर आवश्यक मदत उपलब्ध करून देऊन ते माणुसकीची खरी ओळख करून देत आहेत. समाजातील वंचित आणि गरजू घटकांना आधार देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करून स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली आहे.

**'माझे कार्यालय गरजू नागरिकांसाठी नेहमी खुले आहे.'**

याबत बोलताना नगरसेवक शैलेश पाटील म्हणाले, ज्यांना खरोखर आर्थिक किंवा सामाजिक अडचणी आहेत, त्यांनी निःसंकोचपणे संपर्क साधावा. मी २४ तास जनतेच्या सेवेसाठी तत्पर आहे. प्रत्येकाला शक्य ती मदत करण्याचा माझा प्रयत्न राहील.

दिवा शहरात सामाजिक सेवा आणि दानशूरपणाची परंपरा पुढे नेत नगरसेवक शैलेश पाटील शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करत आहेत. त्यांच्या या जनहितकारी प्रयत्नांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# भाभा हॉस्पिटलमधील गंभीर अनियमिततेबाबत जनसेवक समगिर यांची तीव्र नाराजी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, कुर्ला (मुंबई) :** कुर्ला पश्चिम येथील भाभा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्या, अपुरी आरोग्य व्यवस्था, कर्मचारी वर्गाची अरेरावी, रुग्णांशी होणारे गैरवर्तन आणि उपचारातील कथित निष्काळजीपणाबाबत जनसेवक अजय समगिर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून बृहन्मुंबई महानगरपालिका आरोग्य समिती अध्यक्ष हरिष भांदीर्गे यांना सविस्तर निवेदन सादर करून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात भाभा हॉस्पिटलमधील अनेक गंभीर बाबींकडे लक्ष वेधण्यात आले आहे. हॉस्पिटलमध्ये डॉक्टर व नर्सेसची कमतरता, आपत्कालीन विभागातील विलंब, वरिष्ठ डॉक्टरांची अनुपस्थिती, CT Scan मशीन कार्यरत नसणे, ICU व Blood Bank सुविधांची अपुरी उपलब्धता, रक्त तपासणी व इतर चाचण्यांसाठी रुग्णांना बाहेर पाठविणे, स्वच्छतेचा अभाव, अपुरी सुरक्षा व्यवस्था, हेल्प डेस्कची निष्क्रियता आणि रुग्णवाहिका सेवेतील त्रुटी यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः डिलिव्हरी विभागातील कथित




## आरोग्य समिती अध्यक्षांकडे तातडीच्या कारवाईची मागणी

हलगर्जीपणामुळे महिला व नवजात बालकांच्या मृत्यूच्या घटनांची सखोल व स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ड्युटीदरम्यान मद्यप्राशन करून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करून त्यांची वैद्यकीय तपासणी व CCTV पडताळणी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय काही डॉक्टर, नर्सेस व कर्मचाऱ्यांकडून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी उद्धट, अरेरावीची व असंवेदनशील वागणूक दिली जात असल्याच्या तक्रारी गंभीर असून अशा कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, असे समगिर यांनी म्हटले आहे.

हॉस्पिटलमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही अनेक रुग्णांना विशिष्ट बाहेरील मेडिकल दुकानांमधून औषधे खरेदी करण्यास प्रवृत्त केले जात असल्याच्या तक्रारींची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

जनसेवक अजय समगिर यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, गरीब व सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष सहन केले जाणार नाही. भाभा हॉस्पिटलमधील सर्व १८ गंभीर समस्यांवर तातडीने उपाययोजना करून रुग्णांना सन्मानपूर्वक, सुरक्षित व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी. अन्यथा नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

भाभा हॉस्पिटल हे सर्वसामान्य नागरिकांसाठी आशेचे केंद्र असावे, भीतीचे नाही. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि रुग्णसेवा सुधारण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# बदलापूरच्या जांभळांना भौगोलिक मानांकनामुळे बाजारात प्रचंड मागणी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०१, बदलापूर (ठाणे) :** यंदा बदलापूरच्या जांभळांना सोन्याचा भाव आला आहे.किरकोळ बाजारात साधारणपणे पावकीलो जांभळांसाठी ग्राहकांना १०० ते १५० रुपये मोजावे लागत आहेत.अवीट गोडीची काळीभोर जांभळं अशी बदलापूरची ओळख होतीच,परंतु आता याच जांभळांना अधिकृतपणे भौगोलिक नामांकन म्हणजेच जीआय टॅग मिळाल्याने त्यांची ख्याती आणि महती अधिकच वाढली आहे.

वाढत्या महागाईमुळे जांभूळ प्रेमींना या वर्षी नक्कीच थोडे जास्त पैसे मोजावे लागत असले तरी जांभूळ विकणाऱ्या आणि पिकविणाऱ्यांना मात्र सुगीचे दिवस आले आहेत.जांभळाचे भाव वाढले असले तरी यंदा जांभळाचे पिकही मोठ्या प्रमाणात आल्याने बदलापूरच्या या युनिक चवीच्या काळ्याभोर जांभळांना फक्त बदलापूरतच नव्हे तर मुंबई परिसरातून देखील मोठी मागणी वाढल्याचे पहावयास मिळत आहे.

ज्याप्रमाणे कोकणातील देवगड आणि रत्नागिरी हापूस अस्सल चवीसाठी ओळखला जातो. भौगोलिक मानांकनामुळे आता बदलापूरचे जांभूळ महाराष्ट्रात ओळखले जात आहेत. बदलापूर आणि परिसरात तब्बल १,३०० हून अधिक जांभळांची झाडे असून त्यातून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जात आहे. जांभळांच्या मुख्य बाजारपेठेमध्ये बदलापूरच्या जांभळाला सर्वाधिक मागणी असल्यामुळे अर्थातच काहीशी महागडी असली तरी चवदार जांभळे म्हणून ती ओळखली जात आहेत. बदलापूरचा जांभूळ ब्रँड झाल्यामुळे आता बदलापूरच्या परिसरातील ग्रामीण भागांमध्ये जांभळाच्या झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जात आहे. शेतकऱ्यांसोबतच आता वनविभाग देखील त्यासाठी पुढाकार घेत आहे. बदलापूरप्रमाणे आता पालघर जिल्ह्यातील बहाडोली गावातील जांभूळ देखील पौष्टिक मानले जातात. ते टपोरे व चवदार असतात. ठाणे जिल्ह्यातील भिवंडीजवळील कालवार गावच्या डोंगरात असलेली बारीक जांभळांची चव देखील अनोखी मानली जाते. भाभा अणुसंशोधन केंद्राच्या अहवालानुसार बदलापुराच्या जांभळात अँथोसायनिन आणि अँटी ऑक्सिडंट आढळून आले आहेत. या जांभळाचा रंग अधिक गडद असल्याचे निरीक्षण आहे. सोबतच या जांभळाच्या प्रजातीमध्ये अँटीऑक्सिडंटही असते.

गरवी प्रकारातील जांभूळ मांजर्ली, वालिवली, बोराडपाडा आणि कोंडेश्वर परिसरातून संकलित करण्यात आले होते. या जांभळांची भौतिक, जैवरसायन आणि अँटीऑक्सिडंट अशा तीन पातळ्यांवर तपासणी करण्यात आली. त्यात हा जांभूळ सर्वोत्कृष्ट मानला जात आहे.

दरम्यान बदलापूर जांभूळ साधारणपणे ६०० रुपये किलो दराने बाजारपेठेत उपलब्ध असते. बदलापूर जांभळाच्या नावाने इतर जांभळे ४०० रुपये किलो दराने देखील विकली जातात.

# थोडक्यात

## सोयगाव आगारात एसटी महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०१, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त सोयगाव आगार व बसस्थानक परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहपूर्ण वातावरणात वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी चालक-वाहक, कर्मचारी व प्रवाशांचा सत्कार करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वर्धापन दिनानिमित्त आगार व्यवस्थापनाच्या वतीने बसस्थानक परिसर आणि मुख्य आगाराची आकर्षक रांगोळी व फुलांच्या सजावटीने शोभा वाढविण्यात आली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते 'लालपरी'चे विधीवत पूजन करण्यात आले. तसेच सकाळच्या प्रवासासाठी आलेल्या प्रवाशांचे, महिला व लहान मुलांचे गुलाबपुष्प आणि पेढे देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी वर्षभर सुरक्षित प्रवासी सेवा बजावणारे चालक, प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वर्तन करणारे वाहक तसेच गाड्यांच्या देखभालीत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या यांत्रिक कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करताना अधिकाऱ्यांनी प्रवाशांना दर्जेदार व सुरक्षित सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास आगार व्यवस्थापक मनिष जवळेकर, सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल, वाहतूक नियंत्रक वर्जन जाधव, अशोक तायडे, सतीश पाटील, विनोद जाधव, समाधान जाधव, निलेश पाटील, वाहक अनुराधा महाले, चालक अशोक क्षिरसागर, शिपाई मधुकर आमटे यांच्यासह चालक-वाहक, यांत्रिक विभागातील कर्मचारी व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

## क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** भारत सरकारने देशाला क्षयरोग मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या अनुषंगाने शासन क्षयरुग्णांना मोफत औषधोपचार देत आहे. उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना शासनामार्फत उपचारादरम्यान प्रत्येक महिन्याला निक्षय पोषण योजनेअंतर्गत १००० रुपयाची मदत थेट बँक खात्यामध्ये दिली जात आहे. केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियान हा उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमांतर्गत क्षयरुग्णांना अतिरिक्त पोषण आहार, डायग्नोस्टिक मदत, व्होकेशनल मदत या स्वरुपात मदत उद्योग समूह, सामाजिक संस्था व दानशूर व्यक्ति यांनी करावी असे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून नमुंमपा कार्यक्षेत्रातील रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सीसाईड यांच्यामार्फत नमुंमपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नेरुळ १, शिरवणे, कुकशेत, सानपाडा व तुर्भे येथे उपचार घेणाऱ्या एकूण १०० क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले.

सदर रुग्णांना या अतिरिक्त पोषण आहारामुळे यशस्वी उपचार पूर्ण करण्यास मदत होईल. सदर पोषण आहार किटच्या वितरण कार्यक्रमकरिता नमुंमपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रविण कटके तसेच रोटरी क्लबमार्फत डिस्ट्रिक्ट गव्हर्नर हर्ष मकोल, क्लबचे अध्यक्ष धनंजय सरकार व आर.एस. राघवन, सचिन भोले, नंद शाह, शैलेंद्र कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

तरी केंद्र शासनाच्या या महत्वाकांक्षी उपक्रमास सहकार्य करण्यास इच्छुक उद्योग समूह, स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्ती यांनी नमुंमपा आरोग्य विभाग मुख्यालय अथवा dtomhnvmrntcp.org या ई-मेल आयडीद्वारे 'निक्षय मित्र' म्हणून संपर्क साधावा आणि राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाला सहकार्य करुन एकजुटीने हातभार लावावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## पावसाळ्याआधीच ठाण्यात पुन्हा पाणीबाणी




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.३१, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या पिसे उदंचन केंद्र व टेमघर जलशुद्धीकरण केंद्रातील उच्चदाब सबस्टेशनमध्ये पावसाळ्यापूर्व काही देखभाल आणि तांत्रिक दुरुस्तीची कामे बुधवार दि. ३ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहेत.

या कामांसाठी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत १२ तासांचा पाणीपुरवठा शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे घोडबंदर रोड, वर्तकनगर, लोकमान्यनगर,कळवा,मुंब्रा आदी परिसरांमध्ये पाणीपुरवठा बंद राहील. नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा साठा करून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये देखील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे ठाणे महापालिकेने मे महिन्यात दररोज १० टक्के पाणीकपात केलं होतं. त्यामुळे संपूर्ण मे महिना ठाणेकरांना त्रास सहन करावा लागला होता. ३ जूननंतरही पाणी पुरवठा सुरळीत होईल याची खात्री नाही. महापालिकेने शटडाउननंतर नेहमीसारखा पाणी पुरवठा पूर्ववत होण्यासाठी काही काळ लागू शकतो अशी माहिती दिली. त्यामुळे पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा सुरू राहण्याची शक्यता आहे. रहिवाशांना पाणी साठवून ठेवून देखभाल दुरुस्तीच्या या कामांदरम्यान पालिका प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेने नागरिकांना केले आहे.